# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### शेगाव नगरपालिका (जि.बुलढाणा) येथे मालमत्ता सर्वेक्षण कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१) ४१९४६ (२५-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नगर प्रशासन संचालनाच्या परिपत्रकानुसार ज्या शहरातील मालमत्ता सर्वेक्षणाचे ७० टक्के पूर्ण झाले आहे त्यांनी उर्वरित मालमत्ता कराच्या सर्वेक्षणाचे नगरपालिका कर्मचारी यांच्याकडून करणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव नगरपालिकेचे सर्वेक्षणाचे काम ७८ टक्के पूर्ण झालेले असतांना सुद्धा उर्वरित काम हे कर्मचाऱ्यांचे ऐवजी स्थापत्य कन्सल्टंट या खाजगी कंपनीला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटामध्ये संबंधितांनी गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येऊन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

शेगाव नगरपरिषदेच्या मुळ हद्दीमध्ये असलेल्या १७८८९ मालमत्तांपैकी १४०३० मालमत्तांचे (७८.२३%) सर्वेक्षण झाले होते. तथापि, नगरपरिषदेच्या हद्दीत एकूण ४२१३४ मालमत्ता समाविष्ट झाल्या असल्याने नगरपरिषद संचालनालयाच्या परिपत्रकातील तरतूदीचे पालन करुन मालमत्तांचे सर्वेक्षण मे. स्थापत्य कंन्सलटंट प्रा. लि. अमरावती यांना देण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील नगरपालिका येथे लाभार्थ्यांच्या घरकुलाच्या रक्कमेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२) ४२४३७ (२५-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील नगरपालिकेने पंतप्रधान आवास योजनेतील पहिल्या टप्प्यातील ९० लाभार्थ्यांचे प्रत्येकी २९ हजार रुपये प्रमाणे एकुण २६ लाख १० हजार रुपये परस्पर हडप केल्याचा आरोप पुतळा संघर्ष समितीने केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उमरखेड नगरपरिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या प्रकल्प अहवालातील ९० लाभार्थ्यांकरीता प्रती लाभार्थी रुपये १ लाख याप्रमाणे राज्य शासनाचे अनुदान प्राप्त झाले होते. यापैकी सदरील ९० लाभार्थ्यांना अनुदानाचा प्रथम हप्ता प्रति लाभार्थी रुपये ८० हजार याप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले होते व प्रती लाभार्थी रुपये २९,०००/- याप्रमाणे अनुदानातून कपात करण्यात आली होती. परंतू त्यानंतर कामाच्या प्रगतीनुसार सदर ९० लाभार्थ्यांना शासनाकडून प्राप्त अनुदानाचे संपूर्णपणे रुपये १ लाख याप्रमाणे उर्वरित हप्त्यात अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्या कार्यालयामध्ये सुनावणी दरम्यान सदर प्रकरणातील सर्व कागदपत्रे सादर करण्यात आली. तसेच सर्व कागदपत्रे जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात सुध्दा सादर करण्यात आली आहेत. तसेच जिल्हा सहाय्यक आयुक्त, नगरपालिका प्रशासन, यवतमाळ यांचेमार्फत सदरील प्रकरणी अद्यापपर्यंत ३ सुनावण्या घेण्यात आल्या आहेत.

(४) सदर प्रकरणी नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयात सुनावणी सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी नगरपरिषदेने बांधलेल्या स्मशानभूमीमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३) ४५७६४ (२५-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी नगरपरिषदेने हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन या समाजाकरिता दहा एकर जागेवर बांधलेल्या स्मशानभूमीमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षापासून या चारही स्मशानभूमीमध्ये पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, विजेची व्यवस्था दहन वाहिनीची प्रक्रिया या अंतर्गत कामकाजाकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त इमारतींकरिता लाखो रुपये खर्च करुनही उत्कृष्ट दर्जाचे काम दिसून येत नसल्याने सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१), (२) व (३ ) हे खरे नाही.

कुर्डूवाडी नगरपरिषदेने हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन या समाजाकरीता दहा एकर जागेमध्ये बांधलेल्या स्मशानभूमीमध्ये मुलभूत सुविधा जिल्हा नियोजन व विकास योजनेमधून प्राप्त झालेल्या निधी मधून विविध विकास कामे हाती घेतलेली आहेत. त्याअंतर्गत सदर ठिकाणी पूर्ण जागेला संरक्षक भिंत बांधण्यात आलेली आहे. तसेच दहन कट्टा, प्रवेश कमान, वॉचमन रूम, पाणी टाकी, वेटींग शेड, अंतर्गत रस्ते, बैठक व्यवस्था ही कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर स्मशानभूमी मध्ये झालेल्या विकास कामांची गुणवत्ता तपासणी करुन घेण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून तांत्रिक तपासणी करुन घेण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) शहरात जुने गाव परिसर व आठवडी बाजाराकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत**

**(४) ४५८८६ (२७-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) शहरात जुने गाव परिसर व आठवडी बाजाराकडे जाणाऱ्या मार्गावर बहुतांश ठिकाणी अतिक्रमणामुळे व अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीस अडचणी निर्माण होत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मेहकर शहरातील वाहतुक कोंडी सोडविण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मेहकर नगरपरिषदेकडून गावठाण परिसरात मुख्य रस्त्यावरील व आठवडी बाजार परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमणे तसेच भाजीपाला / फळे इत्यादी विक्रीच्या हातगाड्या वेळोवळी काढण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार (जि.बुलढाणा) शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून गढूळ व अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(५) ४५८९६ (२७-०९-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून गढूळ व अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अशुध्द पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने गढूळ व अस्वच्छ स्वरुपाचा पाणीपुरवठा करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच शहरातील नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) नगरपरिषदेकडुन जलशुध्दीकरण करताना पाण्यामध्ये निर्जंतुकीकरणाकरीता पुरेश्या प्रमाणात क्लोरीन पावडर टाकण्यात येते. तसेच पाणी शुध्दीकरणाकरीता तुरटी, पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड पावडर टाकण्यात येते. पाण्यास पिवळसर रंग येत असल्यास नागरीकांना शहरात जाहिर सूचने/दवंडीद्वारे पाणी गाळुन व उकळुन पिण्याबाबत नगरपरिषदेकडुन सूचित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरात अग्निशमन केन्द्रांची निर्मिती करुन सर्व रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६) ४६०१३ (२५-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात झपाट्याने नागरिकरण वाढत असून शहरात अग्निसुरक्षेसाठी लोकसंख्येच्या आधारावर १०

अग्निशमन केन्द्रांची गरज असतानाही केवळ ५ अग्निशमन केन्द्र असल्याने अग्निसुरक्षा धोक्यात आल्याची बाब माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात टोलजंग इमारती, औद्योगक वसाहती, बैठ्या चाळी यासह इतर आस्थापना विकसित होत असून नविन अग्निशमन केन्द्रांची निर्मिती करुन सर्व रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सोलापूर महानगरपालिकेच्या नविन आकृतीबंधास शासनाकडून दिनांक २८/१२/२०२१ रोजी मान्यता मिळाली आहे. तसेच सेवा प्रवेश नियमावली यासही मान्यता मिळाली आहे. सद्य:स्थितीत अग्निशमन दलाकडील ४५ फायरमन भरतीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तसेच अक्कलकोट रोड, एमआयडीसी येथे नविन अग्निशमन केंद्राकरीता जागेची निश्चिती झाली असून नविन अग्निशमन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मैंदर्गी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) शहरात दुबार सिटी सर्व्हे करण्यासाठीचा प्रस्तावाबाबत

**(७) ४७४९८ (२८-०९-२०२२). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मैंदर्गी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) शहराच्या नगरपालिकेने केलेल्या सिटी सर्व्हेच्या नोंदीमध्ये चुका, तफ़ावती व अडचणी निर्माण झाल्याने दुबार सिटी सर्वे करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे आदेश मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशासनास दिले असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मैंदर्गी शहराच्या सिटीसर्व्हे सन २०११-१२ मध्ये खाजगी संस्थेद्वारे करण्यात आल्याने त्यात ५०% पेक्षा जास्त चुका झाल्याने खरेदी विक्री व्यवहार करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मैंदर्गी शहराचा दूबार सिटी सर्व्हे करताना वाढत्या लोकसंख्येच्या आणि पुढील २५ वर्षात द्याव्या लागणाऱ्या सेवा सुविधांचा विचार करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.
दिनांक १८/०५/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मैंदर्गी शहराच्या सिटी सर्व्हे मध्ये चुका झाल्या असल्याचे आढळुन आले असुन अधीक्षक भुमी अभिलेख, सोलापूर यांचे कार्यालयाकडे फेर सर्व्हेचा प्रस्ताव उप अधीक्षक भुमी अभिलेख, मैंदर्गी यांनी सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत (जि.अमरावती) येथे अग्निशमन दलाचे वाहन उपलब्ध नसल्याबाबत

**(८) ४८९११ (२५-०९-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत (जि.अमरावती) येथे मागील १० वर्षांपासून अग्निशमन दलाचे एकही वाहन उपलब्ध नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील आगीच्या वाढत्या घटना लक्षात घेता आग विझविण्याची यंत्रणाच नसल्याने जवळपासच्या तालुक्यातून अथवा जिल्ह्याच्या ठिकाणाहून अग्निशमन दलाचे वाहन उपलब्ध करून आग नियंत्रणात आणावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ११ वर्षांत १५ ठिकाणी मोठ्या आगी लागून वित्त व जिवीतहानी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतकरीता तातडीने अग्निशमन वाहन व कर्मचारी देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी अग्निशमन वाहन नांदगांव खंडेश्वर नगरपंचायतीला उपलब्ध झालेले असून बाह्यकंत्राटी पद्धतीने कर्मचारी उपलब्ध करुन अग्निशमन केंद्र कार्यान्वित झालेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हारा (जि.अकोला) शहरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(९) ४९००१ (२८-०९-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (जि.अकोला) शहरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरात अनेक ठिकाणी गळतीची समस्या असल्यामुळे पिण्याच्या पाईप लाईनमध्ये गटारातील गढूळ पाणी मिसळत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असतानाही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असतानाही दुरुस्ती न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाहणी करुन नागरिकांना स्वच्छ पाणी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
तेल्हारा नगरपरिषद यांच्याकडे पाणी पुरवठा योजनेतील पाईप गळती दुरुस्तीच्या कामाकरीता कंत्राटदार नियुक्त असून त्यांच्याकडून तातडीने पाईप गळती दुरुस्तीचे काम करण्यात येते.
तेल्हारा नगरपरिषदेला जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा अकोला यांचेकडून दरमहा १० पिण्याच्या पाण्याचे नमूने तपासणी करण्याचे उदिष्ट निश्चित केलेले आहे.
त्यानुसार जिल्हा प्रयोग शाळा अकोला यांनी माहे मार्च, एप्रिल व मे २०२२ या महिन्यात तपासणीकरीता पाठविलेल्या पिण्याच्या पाण्याचा नमुन्यांचा अहवाल "पिण्यास योग्य" प्राप्त झालेला आहे. त्यानुसार नगरपरिषदेकडून नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात येतो, असे दिसून येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ऊसतोड कामगारांना निवासाची चांगल्या दर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ५२२०९ (२७-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऊसतोड कामगार रोजगारासाठी विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असतात, हे खरे आहे काय,
(२) तसेच ऊसतोड कामगारांनी रोजगारासाठी स्थलांतरण करण्यात आलेल्या ठिकाणी त्यांच्या निवासाची गैरसोय होत असून संबंधित साखर कारखान्यांकडून निवाऱ्यासाठी तंबू उभारण्याचे कापड पुरविण्यात येते, परंतु, कापड निकृष्ट दर्जाचे असल्याने ऊन-पावसात कामगारांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात ऊसतोड कामगारांना चांगल्या प्रतीच्या ताडपत्री, चांगल्या दर्जाचे तंबूचे कापड वा निवासाची चांगली सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ऊसतोड मजूरांच्या वास्तव्यासाठी तात्पुरती निवासाची व्यवस्था म्हणून बांबू, तट्टे इ. बाबी पुरविल्या जातात. तसेच ऊसतोड मजूरांसाठी ८१५ पक्की घरे व ३,७२,६०० इतक्या तात्पुरत्या निवासाची सुविधा राज्यातील साखर कारखान्यांनी उपलब्ध करून दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सोलापूर महापालिकेच्या विविध कामांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून उचलण्यात आलेल्या रकमांचा हिशोब प्राप्त झाला नसल्याबाबत

**(११) ५४१५९ (२२-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महापालिकेच्या विविध कामांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून उचलण्यात आलेल्या रकमांचा कोणताही हिशोब प्राप्त झाला नसल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात वारंवार संबंधित विभाग आणि अधिकाऱ्यांना बजावूनही सुमारे १०० कोटी रुपयांचा हिशोब प्राप्त न झाल्याने या रकमा संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून वसुल करण्यात याव्यात असे निर्देश आयुक्त यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आदेशानुसार त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन २०१५ ते २०२२ या कालावधीत विविध विभागांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने रुपये १३१ कोटी इतके अग्रिम देण्यात आले होते.

सदर अग्रिमांचा हिशोब सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर झाला नसल्यामुळे ही बाब ज्यावेळी महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आली, त्यानंतर सदर रक्कमेपैकी आतापर्यंत रुपये ९९ कोटी रक्कमेचे समायोजन विविध खात्याने केले असून रुपये ३२ कोटी इतक्या रक्कमेचे समायोजन करण्याची प्रक्रिया महापालिका स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर शहरात पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने उपयुक्त असलेले महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सुरु करण्याबाबत

**(१२) ५४१६५ (२०-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने उपयुक्त असलेले महात्मा गांधी प्राणी संग्रहालय गेल्या तीन वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने मान्यता रद्द केल्यानंतर हे प्राणी संग्रहालय पुन्हा सुरू होण्याच्या दृष्टीने निधीची तरतूद होऊन आवश्यक सुधारणा होण्यासाठी सोलापूर महापालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निधीची तरतूद करण्यात येऊन सदरहू प्राणी संग्रहालय तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्रीय प्राणी संग्रहालय यांनी सूचविल्यानुसार सुधारणा करण्यात येत असून प्राणी संग्रहालय सुरु करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे मान्यतेस्तव दिनांक २३/९/२०२२ रोजी सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुने सोलापूर (ता.जि.सोलापूर) येथे नाट्यगृह होणेबाबत

**(१३) ५४९७३ (२७-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुने सोलापूर (ता.जि.सोलापूर) येथे नाट्यगृह होणेबाबत स्थानिक नागरिकांची मागणी असून यासंबंधीची प्रस्ताव शासनाकडे गत चार ते पाच वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने जुने सोलापूर येथे नाट्यगृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) नाट्यगृहासाठी मौजे नेहरूनगर येथील मनपा सेवक निवासस्थानासाठी आरक्षित जागेपैकी काही क्षेत्र सांस्कृतिक भवन (नाट्यगृह) बांधणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम ३८ (१) नुसार आरक्षण फेरबदल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील जय भवानी हौसिंग सोसायटीने कर्नाटक राज्यात जाण्याच्या घोषणा केल्याबाबत**

**(१४) ५७१७२ (२१-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील जय भवानी हौसिंग सोसायटी ही नगरपालिका ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत येत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सोसायटीमधील जवळपास चार ते पाच हजार नागरिकांना कोणत्याही शासकीय योजना तसेच कागदोपत्री पुराव्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात नगरपालिका किंवा ग्रामपंचायत हद्दीत समावेश करुन न घेतल्यास तेथील नागरिकांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कर्नाटकमध्ये समावेश करण्याची घोषणा देऊन आत्मदहनाचा इशारा देखील दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, प्रस्तावित श्री संत कान्होपात्रा नगर या स्वतंत्र ग्रामपंचायतीमध्ये सदर क्षेत्र समाविष्ट आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर क्षेत्र नगरपरिषदेच्या हद्दीत येत नसले तरी, मंगळवेढा नगरपरिषदेमार्फत पिण्याचा पाण्याचा पुरवठा, स्वच्छता, जंतुनाशक फवारणी केली जाते. तसेच कॉलनीलगत नगरपरिषदेची सार्वजनिक शौचालय सुविधा आहे. अंशत: दिवाबत्तीची सोय केलेली आहे व आवश्यकतेनुसार अग्निशमन सेवा पुरविली जाते.

(३) होय, हे खरे आहे.

जय भवानी हौसिंग सोसायटीची कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत येत नसल्याने सदर लोकवस्तीला वेगळ्या क्षेत्राची मान्यता द्यावी याकरिता सामूहिक आत्मदहनाचा इशारा शासनास देऊन त्याची प्रत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयास सादर कलेली आहे.

(४) मंगळवेढा ग्रामीण हद्दीतील एकूण २३८१ गटांबाबत श्री संत कान्होपात्रानगर अशी स्वतंत्र ग्रामपंचायत नव्याने स्थापन करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील खामगांव नगर परिषदेची हद्दवाढ करणेबाबत**

**(१५) ५७१९६ (२४-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता खामगांव नगरपरिषद क्षेत्राच्या बाहेर अनिवासी व वाणिज्य क्षेत्र निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव नगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून व वाढीव क्षेत्रातील नागरीकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शहराची हद्दवाढ करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मुख्याधिकारी नगर परिषद खामगांव यांनी हद्दवाढीचा प्रस्ताव प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडे मंजुरीसाठी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) खामगाव नगरपरिषदेच्या हद्दवाढीचा प्रस्ताव नगरपरिषदेने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे दिनांक १९/१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या स्तरावर प्रस्तावाची छाननी करण्यात येत असून अद्याप जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

---

**सोलापूर महापालिकेतील जुना पुणे नाका ते सोरेगाव या रस्त्याच्या भूसंपादनासाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(१६) ५७९६२ (२४-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महापालिकेने जुना पुणे नाका ते सोरेगाव या ५४ मीटर रस्त्याच्या भूसंपादनासाठी ५४ कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला असून सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात भूसंपादनाबाबतचे अधिसूचना अद्याप निघाली नसल्याने सोलापूर शहरातील उड्डाण पुलाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपुलाची कामे तातडीने करण्यासाठी तसेच बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

उड्डाणपुलाच्या भुसंपादनासाठी शासन हिस्सापोटी प्राप्त झालेला पहिला हप्ता रुपये ४१.८६ कोटी इतकी रक्कम तसेच महानगरपालिका हिस्सापोटी रुपये १.६७ कोटी रक्कम अशी एकूण रुपये ४३.५३ कोटी इतकी रक्कम विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक सोलापूर यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील पार्क स्टेडियम येथे महापालिकेची सुरू असलेली जिम बंद करण्यात येणार असल्याबाबत**

**(१७) ५७९६३ (२४-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील पार्क स्टेडियम येथे महापालिकेची सुरू असलेली जिम महानगरपालिका बंद करणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पार्क स्टेडियम येथील पारंपारिक जिम बंद केल्यास गरीब गरजू विद्यार्थी आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार असल्याने सदर जिम बंद करू नये अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

पार्क स्टेडियम जिमखाना हे दिनांक १६/३/२०२० ते दिनांक ३/११/२०२० अखेर व दिनांक १/५/२०२१, दिनांक १/६/२०२१ अखेर शासनाच्या आदेशान्वये कोविड-१९ या साथीचा प्रादुर्भाव वाढल्याने जिमखाना बंद ठेवण्यात

आला होता. त्यानंतर सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड सोमपा जिमखान्याच्या नुतनीकरणाचे काम हे दिनांक ३/९/२०२१ पासून चालु करण्यात आले असल्याने जिमखाना बंद ठेवण्यात आला होता. सदरचे काम पुर्ण होत आले आहे. त्यानंतर सदर सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडून मनपाकडे जिमखाना हस्तांतरण प्रक्रिया पार पडेपर्यंत जिमखाना खाजगी ठेकेदारामार्फत चालविणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही चालु करण्यात आली आहे. त्यानंतर जिमखाना सुरू करण्यात येईल.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करण्याबाबत

**(१८) ५७९६६ (२४-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज तलावातील जलपर्णी काढून तलावाचा विकास करावा या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने अंगावर जलपर्णी गुंडाळून अनोखे आंदोलन करण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजी महाराज तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करण्यासाठी गेल्या पाच-सहा वर्षांपासून गाळ काढण्याचे काम सुरू असून त्यास केंद्र व राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला असतानाही अद्याप या तलावाचे सुशोभीकरण व संवर्धन न होण्याची सर्वसाधारण कारणे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) छत्रपती संभाजी महाराज तलावातील जलपर्णी काढण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या निधीतून रुपये २,८९,५५४/- इतक्या रक्कमेचा मत्ता दिनांक २५/१/२०२३ रोजी काढण्यात आला होता. त्यानुसार जलपर्णी काढण्याचे काम आजमितीस पुर्ण करण्यात आले आहे. तसेच तलाव परिसरातील ड्रेनेज लाईन चे काम पुर्ण होणार नाही तोपर्यंत जलपर्णी काढणे करीता वार्षिक रक्कम रुपये १० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.

होटगी रोड कडील इदगाह व परिसरातून ड्रेनेज चे घाण पाणी तलावात येते. ते बंद करण्यासाठी सुधारीत प्रकल्प अहवाल एकूण रुपये ३.४५ कोटी इतक्या रक्कमेचा केला असून त्यापैकी २.२४ कोटी इतक्या रक्कमेचे तलाव परिसरात ड्रेनेज लाईन चे काम व तलाव परिसरात उर्वरित भागात तारेचे कुंपण करणे व तलावातील जलपर्णी काढणे या कामाचे पूर्वगणनपत्रक केले आहेत. त्याबाबत Ministry of Environment, Forest & Climate Change (MOEFCC), नवी दिल्ली यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले असून मंजूरी प्राप्त झाल्यावर ड्रेनेज लाईन व तारेचे कुंपण करणेचे काम हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिकेने दिव्यांगांना मिळणारा उदरनिर्वाहाचा भत्ता वेळेवर देण्याबाबत

**(१९) ५८६२९ (२१-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेने दिव्यांगांना मिळणारा उदरनिर्वाहाचा भत्ता वेळेवर मिळत नसल्याची तसेच सन २०१९-२० या वर्षातील दिव्यांगासाठीचे असलेले १० कोटी रुपये अखर्चित ठेवल्याची तक्रार अपंग संघटनेकडून शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगाना भत्ता वेळेवर मिळत नसल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दिव्यांगांना उदरनिर्वाहाचा भत्ता वेळेवर देण्याबाबत व दिव्यांगाचे अखर्चित असलेले १० कोटी रुपये देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही. सोलापूर महानगरपालिकेकडून दिव्यांग लाभार्थ्यांना दरमहा उदरनिर्वाह भत्ता देण्यात येत आहे. त्यामुळे दिव्यांगासाठीचे असलेले रुपये १० कोटी रक्कम अखर्चित नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) शहरातील कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(२०) ५९८१० (२२-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) शहरातील कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गेल्या ५० दिवसांपासून वेतन अदा न केल्याने घंटागाडी कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांचे वेतन अदा न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली आहे तसेच या कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने अदा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
शहरातील कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडी कंत्राटी कर्मचारी यांनी दिनांक १७/१/२०२३ रोजी माहे डिसेंबर, २०२२ चे वेतन ठरलेल्या दिनांकापेक्षा ११ दिवस उशीर होऊनही न झाल्याने एक दिवस काम बंद आंदोलन केले होते. त्याअनुषंगाने कंत्राटदारास खामगाव नगरपरिषदेने कारणे दाखवा नोटीस बजावताच कंत्राटदाराने दिनांक १८/०१/२०२३ रोजी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जेजुरी नगरपरिषद (ता.पुरदंर जि.पुणे) येथे शिपाई व सफाई कामगार कर्मचारी पदाकरिता स्थानिक उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याबाबत

**(२१) ५९८२२ (११-०५-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेजुरी नगरपरिषद (ता.पुरदंर, जि.पुणे) येथे शिपाई व सफाई कामगार कर्मचारी, यांची पदे चाळीसगाव (जि.जळगाव) येथील रोजंदारी कर्मचारी समावेशांतर्गत करण्याबाबत आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे या पदांवर सध्या कार्यरत असलेले कर्मचारी बेरोजगार होणार असून त्यांच्या कुटूंबियांच्या उदारनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिपाई वर्ग ३ व सफाई कामगार वर्ग ४ या पदाकरिता चाळीसगाव (जि.जळगाव) येथील कर्मचाऱ्यांना दिलेले समायोजनचे आदेश तात्काळ रदद करुन स्थानिक उमेदवारांना प्राधान्याने नियुक्ती आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
संचालनालयाकडील पत्र दिनांक ८/२/२०२२ अन्वये राज्यातील नगरपरिषदेमधील दिनांक ११/३/१९९३ ते २७/३/२००० या कालावधीमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत कार्यवाहीचे आदेश दिलेले आहेत. त्यास अनुसरून चाळीसगांव मधील १ शिपाई आणि १२ सफाई कामगार यांना जेजुरी नगरपरिषदेमध्ये पदस्थापना देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
रोजंदारी कर्मचाऱ्यांचे समावेशन शासनाच्या धोरणाप्रमाणे फक्त रिक्त असणाऱ्या पदांवरच झाले आहे. सद्य:स्थितीमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागेवर समावेशन करण्यात आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील अंजनगांव सुर्जी येथील स्थानिक हरणे विद्यालयाकडे जाणारा यशनगर डीपी रोड वर अतिक्रमण करून बंद केल्या बाबत

**(२२) ५९९८७ (११-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगांव सुर्जी (जि.अमरावती) येथील स्थानिक हरणे विद्यालयाकडे जाणारा यशनगर डीपी रोड लागून असलेल्या महामार्गापासून भावे ले-आऊट व यशनगरमध्ये अस्तित्वात आहे पण याच मार्गाला लागून मौजा खेल कृष्णाजी सर्व्हे क्र. ८८/२ मधील वादग्रसत गुंठेवारी ले-आऊटची परवानगी देताना भूमापन मोजणी खुणा कायम न केल्याने या डीपी रोडवर खोदकाम करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांकडे तक्रार दाखल करुन तसेच वकिलामार्फत नोटीस देऊनही नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत आहे वारंवार तक्रारी करुनही या अतिक्रमणाची कोणतीही चौकशी होत नसल्याने या विभागातील ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शसनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे खेल कृष्णाजी सर्व्हे क्रमांक ८०/२ मधील बांधकामधारक श्री. अकुंश मोहन पाटील यांनी बांधकाम परवानगीपेक्षा जागेवर जास्त खोदकाम केल्याची तक्रार नगरपरिषदेकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार नगरपरिषदेने अतिक्रमण धारकास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना नियम, १९६६ च्या कलम ५३ अंतर्गत दिनांक ३१/१/२०२३ रोजी नोटीस बजावून परवानगीपेक्षा जास्त असलेले खोदकाम बंद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघात अल्पसंख्यांक विकास योजनेतर्गत निधी मिळणेबाबत**

**(२३) ६०७२८ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघात अल्पसंख्यांक विकास योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक समाजाच्या स्मशानभूमी व दफनभूमी येथे सोयीसुविधा व विकास करण्यासाठी सुमारे १.९० लक्ष रुपयाचा निधी मिळावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, यांचेकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अल्पसंख्याक समाजाच्या स्मशानभूमी व दफनभूमी येथील सर्वांगीण विकास करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१०-१०-२०२३) :** (१) होय,

(२) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल नागरी वस्तीत विविध मुलभूत / पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता निधी मागणीचे अनेक प्रस्ताव प्राप्त झालेले होते. तथापि, उपलब्ध निधी विचारात घेऊन विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील तसेच महाराष्ट्र राज्यातील अनेक कर्मचारी विविध नगरपंचायतमध्ये कार्यरत असलेले सर्व कर्मचारी समावेशनाविना सेवा करीत असल्याबाबत**

**(२४) ६२१२२ (११-०५-२०२३). श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील तसेच महाराष्ट्र राज्यातील तालुक्याच्या ठिकाणी मुख्यालय असलेल्या १०१ ग्रामपंचायतींचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याकरीता शासनाने दिनांक १ मार्च २०१४ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.एमयुपी-२०१५/प्र.क्र.९९/नवि-१९ दिनांक २४ मे २०१६ ने अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन तालुक्यातील मुख्यालयाच्या ठिकाणचे ग्रामपंचायतचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकास विभागाकडील १९ जानेवारी २०१७ चे शासन निर्णयाप्रमाणे प्रारूप अधिसूचनेच्या वेळी ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचेच फक्त समावेशन मंजुर आकृतीबंधानुसार झालेले असून, अधिसूचना १ मार्च २०१४ ते अंतिम अधिसूचना २४ मे, २०१६ या कालावधीत तत्कालीन ग्रामपंचायतमध्ये कार्यरत कर्मचाऱ्याचे समावेशन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्हयातील वर्ग-३ च्या २१ व वर्ग-४ च्या ३५ असे एकुण ५६ कर्मचारी हे समावेशनापासून वंचित राहीलेले असून, उक्त नगरपंचायतीमध्ये तेव्हापासून आतापर्यंत अल्पशः वेतनावर कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात अशाच प्रकारचे अनेक कर्मचारी विविध नगरपंचायतमध्ये समावेशनाविना सेवा करीत असून, पुढील काळात त्यांच्या त्यांच्यावर देखील उपासमारीची वेळ येऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

सातारा जिल्ह्यातील वर्ग ३ चे २५ व वर्ग ४ चे ३१ कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यात आलेले नाही. तथापि राज्यात नवनिर्मित नगरपरिषद/ नगरपंचायत निर्मितीची प्रथम अधिसुचना व अंतिम अधिसुचना दरम्यान ग्रामपंचायत सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांना किमान वेतन अधिनियमानुसार वेतन अदा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अल्पसंख्यांक विकास योजनेतून चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) विकासकामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२५) ६२४२२ (२५-०४-२०२३). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) अल्पसंख्यांक विकास योजनेतून विविध विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मागणीच्या अनुषंगाने विकासकामांना तात्काळ निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१०-१०-२०२३) :** (१) होय,
(२) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास योजनेंतर्गत अल्पसंख्याक बहुल नागरी वस्तीत विविध मुलभूत / पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता निधी मागणीचे अनेक प्रस्ताव प्राप्त झालेले होते. तथापि, उपलब्ध निधी विचारात घेऊन विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील नागरिकांना साथींच्या आजारातून मुक्त करण्यासाठी संयुक्त मोहीम राबविण्याबाबत**

**(२६) ६४१०८ (१२-०५-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात खाजगी स्वीपर गाड्यांच्या माध्यमातून स्त्यांवरची धूळ दररोज ३५ ते ४९ टन गोळा करण्यात येऊन ही शहराला प्रदुषणाचा विळखा पडल्यांने शहरातील नागरीक धुळीमुळे खोकला, सर्दी, श्वसन व त्वच्या रोगांच्या आजाराने त्रस्त असून या आजाराचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत असल्याची बाब माहे २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर शहराला धुळीच्या प्रदुषणातून मुक्त करुण नागरीकांना होणाऱ्या सर्दी, खोकला, श्वसन आणि त्वच्या रोग या साथींच्या आजारातून मुक्त करण्यासाठी महानगरपालिका व शासनाने कोणती संयुक्त मोहीम राबवली वा राबविण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) सोलापूर शहारात महानगरपालिकेच्या स्वीपर गाड्यांच्या माध्यमातून दररोज सरासरी ३० टन धुळ (माती) उचलली जाते हे खरे आहे. तथापि शहरामध्ये खोकला, सर्दी आजार वाढल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) शहरात माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ भारत अभियान या योजनांच्या माध्यमातून शहरातील जुन्या संकलित केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे व जमा झालेल्या आजोऱ्याचा पुनर्वापर करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. तसेच सर्दी, खोकला, श्वसनाचे आजार हे व्हायरल असल्याने तसेच हवामान बदलामुळे होणारे आजार आहेत, याकरीता सोलापूर महानगरपालिकेकडे दवाखाने तसेच १५ नागरी आरोग्य केंद्र, १ पॉलिक्लिनिक, सिव्हिल हॉस्पिटल, रेल्वे हॉस्पिटल मार्फत मोफत व अगदी माफक दरात वैद्यकिय सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोसरे-बौध्दवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी)) येथील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२७) ६४९८१ (२५-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्त्रो) मार्च २०२३ मध्ये वा त्यासुमारास प्रसिद्ध केल्या अहवालामध्ये राज्यात २००० ते २०२१ या कालावधीत भूस्खलनाच्या ५ हजार ११२ घटना घडल्याचे नमूद केले असून राज्यातील रत्नागिरी या जिल्ह्यांचा भूस्खलनप्रवण यादीत समावेश असल्याचेही स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोसरे बौध्दवाडीवर (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे दिनांक २२ जुलै २०२१ रोजी अतिवृष्टीमुळे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत जीवतहानी होऊन १६ जणांना प्राण गमावले असून ९ कुटुंबे बेघर झाले असतानाही अद्यापी या कुटुंबांना आजमितीस या घरे मिळालेली नसून त्यांचे योग्यप्रकारे पुनर्वसन झालेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू दुर्घटनेत बेघर झालेल्या आपतग्रस्ताना विनाविलंब घरे मिळावीत तसेच त्यांचे योग्यप्रकारे पुनर्वसन व्हावे या मागणीसाठी खेड तालुका बौध्द समाज सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी तहसिलदार खेड, प्रांताधिकारी, खेड तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी आदिकडे निवेदनान्वये पाठपुरावा करूनही मागील २ वर्षापासून संबंधीतांकडून कोणतीही दखल आजमितीस घेतलेली नसल्याने आता याप्रकरणी आक्रमक पवित्रा घेण्याचा निर्धार बौध्द समाज सेवा संघाने केला आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, दरड कोसळून बेघर झालेल्यांचे योग्यप्रकारे पुनर्वसन न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन आपदग्रस्त कुटुंबांना लवकरात लवकर घरे देवून त्यांचे योग्यप्रकारे पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच भूस्खलनाचा धोका असलेल्या ११ जिल्ह्यामधील गावांचे शासनाने सर्वेक्षण करून आपत्ती काळात होणारी संभाव्य जीवित व वित्तहानी रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१३-१०-२०२३) :** (१) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या कार्यालयाकडून भूस्खलनाचा धोका असलेल्या डोंगर उतारावरील गावाबाबतचा अभ्यास करण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, पुणे यांच्याकडून दोन शोध प्रकल्प सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये हाती घेण्यात आले होते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हयातील ४५ गावाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

याशिवाय, दि. २१ व २२ जुलै, २०२१ रोजी रत्नागिरी जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या तसेच, संभाव्य धोकादायक (दरड कोसळणे, भूस्खलन) असलेल्या गावांचे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, पुणे यांच्याकडून सर्वेक्षण करण्यात आले असून उक्त कार्यालयाच्या सन २०२२ मध्ये प्राप्त झालेल्या सर्वेक्षण अहवालामध्ये सूचविण्यात आलेल्या उपाययोजना/सूचनांचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या कार्यालयांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) खरे आहे.

(३), (४) व (५) मौजे पोसरे बौध्दवाडी ता. खेड येथे दि.२२.०७.२०२१ रोजी दरड कोसळून बाधित झालेल्या ९ कुटुंबाचे तात्पुरते पुनर्वसन अलोरे ता. चिपळून येथील शासकीय वसाहतीमध्ये करण्यात आले असून उक्त कुटुंबे सध्या त्या ठिकाणी वास्तव्यास आहेत.

उक्त बाधित कुटुंबाचे तथा ग्रामस्थांचे पुनर्वसन मौजे खोपी ता. खेड येथील गट नं. ४६७ क्षेत्र येथे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असता सदर ठिकाणी पुनर्वसन करण्यास ग्रामस्थांनी विरोध दर्शविल्याने उप विभागीय अधिकारी, खेड यांनी मौजे पोसरे खुर्द बौध्दवाडी येथील एकूण २३ स.नं. च्या जागा पुनर्वसनासाठी सुचविल्या होत्या. परंतू, सदर मिळकतीच्या सहहिस्सेदारांनी संमती न दिल्याने उक्त जागेवर बाधीत कुटुबांचे पुनर्वसन होऊ शकले नाही. तदनंतर मौजे असगणी ता.खेड येथील सं.नं. ५०५/अ/१ येथील क्षेत्रावर पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या स्तरावर विचाराधीन असून उक्त जागा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी शासनास विनंती केली असता दि. १४.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार पुनर्वसन करावयाच्या बाधित कुटुंबाची संख्या १५ किंवा कमी असल्यास अशा प्रकरणी सर्वसाधारणपणे त्यांचे पुनर्वसन त्यांनी स्वत: करण्याबाबत संबंधित बाधीत कुटुंबियांशी तहसिलदार, खेड यांच्या समवेत दि. २६.०६.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत विचारणा केली असता उक्त कुटुंबीयांनी ते स्वेच्छा पुनर्वसनास तयार नसल्याचे लेखी कळविले आहे.

मौजे पोसरे बौध्दवाडी येथे दरड कोसळून बाधीत झालेल्या कुटुबांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कळविल्यानुसार वरीलप्रमाणे कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाने राज्यातील सीमा तपासणी नाक्यांचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेतला असल्याबाबत

**(२८) ६६४५४ (३१-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या परिवहन विभागाने राज्यातील २२ सीमा तपासणी नाक्यांचा "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपासणी नाके नफेखोर, भांडवली, खासगी कंपन्याना विकले जाणार असून, त्यामुळे जनतेची पिळवणूक होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने फेरनिर्णय घेवून सदरील खासगीकरण मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) होय,

दि.२५.०३.२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सीमा तपासणी नाक्यांचे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला.

(२) नाही

(३) लागू नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे नदीकाठ सुधार प्रकल्पामुळे पुराचा धोका वाढणार असल्याबाबत

**(२९) ६६७९३ (२४-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिका नदीकाठ पुनरुज्जीवन प्रकल्प मुठा नदीला मारक असून नदीचा प्रवाह लक्षात घेता तशीच तिची जैवविविधता जपणे आवश्यक असल्याचे मत या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीचे कॅनॉल करणे, सुशोभीकरण करणे, सांडपाणी सोडत राहणे म्हणजे पुनरुज्जीवन नसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नद्यांची नैसर्गिक स्थिती ओळखून शासनाने नियोजन करुन या प्रकल्पामुळे आणखीन मुठा नदीला पुराचा धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नदी पुनरूज्जीवन प्रकल्पांतर्गत नदीची पुरवहन क्षमता वाढणे, नदीलगत हरीतपट्टा तयार करणे, नदी लगतचा रहिवासी भाग संरक्षित करणे, नदी किनारी होणारी अतिक्रमणे, राडारोडा टाकणे ई. बाबींना आळा बसविणे, पर्यायाने नदी पात्रातील पाणी स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे, नदीकाठी असणारी वारसा स्थळे जतन करणे, पब्लिक स्पेसेस अंतर्गत नागरिकांसाठी प्रोमिनाड, उद्यान विकसित करणे ई. कामे नियोजित आहेत.

(३) हे खरे नाही.

प्रकल्प अहवाल तयार करताना २५ वर्षाची व १०० वर्षाची उच्चतम पूरपातळी विचारात घेण्यात आली आहे. नदीचे सुधारित काटछेदामुळे नदीची वहन क्षमता वाढणार असून त्या बाबतची तपासणी CWPRS खडकवासला पुणे, या संस्थेडून करून घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात १५ ई टॉयलेट वापराविना बंद असल्याबाबत

**(३०) ६६७९५ (२७-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये १५ ई-टॉयलेट वापराविना बंद असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महापालिकेकडून ई-टॉयलेट देखभाल दुरुस्तीसाठी दर महिन्याला १ कोटी १० लाख रुपयास मंजुरी देणे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ई-टॉयलेट वापराविना बंद असतांना नवीन ई-टॉयलेटला मंजुरी दिल्यास जनतेच्या पैशाचा अपव्यव होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वापराविना बंद असलेले १५ ई-टॉयलेटची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.

पुणे शहरामध्ये १५ ई-टॉयलेट नसून ११ ई-टॉयलेट आहेत व ते  कार्यान्वित करणे कामी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

सर्व ई-टॉयलेट दैनंदिन देखभाल दुरुस्ती करून कार्यान्वित करणे साठी ३+२ वर्षे (Extendable) असे एकत्रित ५ वर्ष कालवधी करिता एकूण रु.१,१०,७२,४००/- खर्चाची मान्यता घेण्यात आली असून निविदेतील अटीशर्थीनुसार प्रथमतः ११ पैकी ५ ई-टॉयलेट कार्यान्वित करणे व पुढील ६ महिने देखभाल दुरुस्ती करिता कार्यादेश देण्यात आले आहेत.

त्यापैकी २ ई-टॉयलेट कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित ३ ई-टॉयलेट कार्यान्वित झाल्यानंतर ई-टॉयलेट वापराची वारंवारता व कामाची गुणवत्ता याबाबत आढावा घेऊन निविदेनुसार पुढील कामकाज करण्यात येणार आहे.

(२) खरे नाही.

सदर देखभाल दुरुस्ती ११ ई-टॉयलेट करिता दरमहा रु.१ कोटी १० लाख नसून ५ वर्ष कालावधीकरिता एकूण रु. १,१०,७२,४००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर ११ ई-टॉयलेट पैकी ५ ई-टॉयलेट दुरुस्ती करून कार्यान्वित करणेस अ) दुरुस्ती करणे ५ x १,२८,४०० = ६,४२,००० रु. + GST ब) ६ महिने कालावधी करिता चालविणे ७००० x ११ x ६ =४,६२,००० रु. + GST असे एकूण खर्च = ११,०४,००० रु. + GST इतका आहे.

तद्नंतर ई-टॉयलेट वापराची वारंवारता व कामाची गुणवत्ता याबाबत आढावा घेऊन निविदेनुसार उर्वरित सर्व ई-टॉयलेट कार्यन्वित करणे या अटीवर ५ वर्षाकरिता ११ ई-टॉयलेट करिता देखभाल दुरुस्ती खर्च एकूण रु. १,१०,७२,४००/- या खर्चाकरिता मंजुरी देण्यात आली आहे.

(३) खरे नाही.

नवीन ई-टॉयलेटला मंजुरी देण्यात आलेली नाही.

(४) ई-टॉयलेट देखभाल दुरुस्ती करून ५ वर्षाकरिता चालविणे कामी निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात आले असून, सदरचे कामाबाबत सर्वप्रथम ५ ई-टॉयलेट दुरुस्ती करून पुढील ६ महिने कालावधी करिता प्रायोगिक तत्वावर सुरु करून कामाची उपयुक्तता वापराची वारंवारता व गुणवत्ता याबाबत आढावा घेऊन निविदेतील उर्वरित कामाच्या कालावधीसाठी सर्व ई-टॉयलेट दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळवले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महापालिकेच्या इमारतीत अनधिकृत वॉशिंग सेन्टर सुरू असल्याबाबत

**(३१) ६६८०१ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक ०२ मधील आळंदी रस्त्यावर महापालिकेच्या नानासाहेब परुळेकर क्रीडा संकुलाच्या पार्किंगमध्ये महापालिकेची परवानगी ना घेता गाड्यांचे वॉशिंग सेन्टर सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाड्या धुण्यासाठी मोठी प्लास्टिक टाकी ठेवण्यात आली असून मीटर बसविलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरहू वाशिंग सेंटर विभागाचे अधिकारी व वॉशिंग सेंटर चालवत असलेली व्यक्ती यांच्यामध्ये संगनमताने गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित महापालिका विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्या निलंबनाच्या प्रस्तावाबत

**(३२) ६६९५३ (२७-०८-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, श्री.दादाराव दत्तात्रय डोलारकर यांनी घनकचरा निविदेची माहिती वारंवार पत्र देऊन सुद्धा न दिल्यामुळे व सदर माहिती मा.उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठांमध्ये देणे अनिवार्य असताना न देतांना आपल्या कर्तव्यामध्ये कसूर केले असल्याचा ठपका ठेवत आयुक्त, अमरावती यांनी दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास नगरविकास संचालनालय मार्फत सचिव, नगर विकास यांना श्री.डोलारकर यांच्या निलंबनाचा प्रस्ताव पाठवले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत श्री.डोलारकर यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री.डोलारकर यांना निलंबित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे, मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांच्या निलंबनाबाबत प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून एप्रिल २०२३ मध्ये विभागास प्राप्त झाला होता. तथापि विभागीय चौकशी नियम पुस्तिकामधील तरतुदींनुसार प्रस्ताव नसल्याने दोषारोप पत्राचे प्रारुप, संबंधित मुळ कागदपत्रे आणि नेमकी अनियमीतता नमूद करून परिपुर्ण प्रस्ताव दि.१७.०५.२०२३ च्या पत्रान्वये मागविला होता.

(२) व (३) विभागीय चौकशी नियम पुस्तिकामधील तरतुदींनुसार प्रस्ताव नसल्याने दोषारोप पत्राचे प्रारुप, संबंधित मुळ कागदपत्रे आणि नेमकी अनियमीतता नमूद करून परिपुर्ण प्रस्ताव दि.१७.०५.२०२३ च्या पत्रान्वये मागविला होता. त्यानुसार विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचे कार्यालय, अमरावती कॅम्प, अमरावती यांनी श्री. डोलारकर, मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांचे निलंबन करुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याकरीताचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिकेने मौजे बोळींज म्हाडा वसाहत आरक्षण क्र. १६२ मध्ये क्रीडा संकुल व क्लब हाऊस विकसित करण्याबाबत

**(३३) ६७१२१ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिकेने मौजे बोळींज म्हाडा वसाहत आरक्षण क्र.१६२ मध्ये क्रीडा संकुल व क्लब हाऊस विकसित करण्यासाठी मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या ठेकेदार कंपनीला काम देऊन माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये या कामाचे भूमिपूजन करण्यात आले परंतु गत ६ वर्षापासून ५०% काम पूर्ण झाले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ निविदा रक्कम ४३ कोटी १० लाख ९४ हजार २६५ असताना १२.४०% वाढीव दराने ४८ कोटी ४५ लाख ४९ हजार ९४५ इतकी रक्कम वाढवून देण्यात आली असून, टेंडर प्रक्रियेमध्ये कोणता बदल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने १२.४०% वाढीव रक्कम निविदा रकमे पेक्षा जास्त देण्याचा प्रस्ताव कोणी दिला असून, त्यास मंजुरी देण्यात आली होती काय व त्यानुषंगाने ठेकेदाराने त्याबाबतची मागणी महानगरपालिकेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) निविदेमध्ये व १२.४०% वाढीव रक्कम मंजूर करतांना हे काम १८ महिन्यात पूर्ण करण्याची अट घालण्यात आली होती काय व त्यानुषंगाने सदरहू काम १८ महिन्यात पूर्ण न झाल्यास सदर ठेकेदाराला द. म. किती दंड आकारण्यात आला आहे,
(५) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत ठेकेदाराला देण्यात आलेल्या २१ कोटी २२ लाख ४८ हजार रुपयांचे काम केले आहे किंवा नाही याचा तपास करण्यात आला आहे,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबधीत ठेकेदाराला ४ वेळा मुदतवाढ देऊनही ही ५०% पण काम पूर्ण केले नाही तरीही एकूण खर्चाच्या ५०% रक्कम दिल्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) उपरोक्त विषयी विधानमंडळ आयुधाद्वारे सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.
(२) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे बोळींज आरक्षण क्र. १६२ प्ले ग्राऊंड विकसित करण्याच्या कामाकरिता रुपये ४३.१० कोटीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिल्याचे व उपरोक्त कामांच्या निविदा प्रक्रिया अंतर्गत वाटा-घाटी अंती १२.४० % जादा दरानुसार म्हणजचे रुपये ४८.४५ कोटीच्या निविदेस मान्यता दिल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) उपरोक्त कामांकरिता प्राप्त झालेल्या ३ ई-निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्याशी वाटाघाटी अंती १२.४० % जादा दरानुसार म्हणजचे रुपये ४८.४५ कोटीच्या निविदेस मान्यता दिल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर प्रकरणी दिनांक १९.०१.२०१८ रोजीच्या कार्यादेशानुसार काम पुर्ण करण्याची मुळ मदत १८ महिने होती. तथापि, तत्कालीन पुर परिस्थिती, कोविड प्रादुर्भाव त्या अनुषांगिक लॉक डाऊनच्या कारणामुळे सदर कामास ३ वेळा महानगरपालिकेच्या स्तरावर मुदत वाढ देण्यात आलेली आहे.
(५) व (६) सदर काम पुर्ण करण्याकरिता १८ महिन्यांची मुदत विहित करण्यात आली होती. तत्कालीन पुर परिस्थिती, कोविड प्रादुर्भाव त्या अनुषांगिक लॉक डाऊनच्या कारणामुळे सदर कामास ३ वेळा महानगरपालिकेच्या स्तरावर मुदत वाढ देण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी ठेकेदारास रुपये २०.१८ कोटीचे देयक अदा केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
उपरोक्तचे काम मार्च, २०२४ अखेरीस पुर्ण करण्याचे तजविज महानगरपालिका स्तरावर ठेवण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याचे प्रशासन उत्तरदायी, सुलभ, गतिमान व पारदर्शी व्हावे यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३४) ६७८८६ (३०-०८-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे प्रशासन उत्तरदायी, सुलभ, गतिमान व पारदर्शी व्हावे यासाठी सामान्य प्रशासन विभागाने माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सुशासन नियमावली तयार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियमावलीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर नियमावलीच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२३) :** (१) प्रशासन उत्तरदायी सुलभ, स्वच्छ, पारदर्शी आणि गतिमान करण्याकरिता सुशासन नियमावलीचा मसुदा तयार करुन शासनास सादर करण्यासाठी दिनांक २७/५/२०२२ च्या शासन निर्णयान्वये सुशासन समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २८/२/२०२३ रोजी मुख्य सचिव यांना समितीचा अहवाल सादर केला आहे. सदर अहवालास शासनाने दिनांक १९/५/२०२३ रोजी मान्यता दिली आहे.
(२) सुशासन समितीने केलेल्या शिफारशींमध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.
सार्वजनिक अभिलेख्यांचे व्यवस्थापन करणे, शासकीय कामकाज करताना जनतेच्या तक्रारींचे निवारण करणे, शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, कार्यालयीन जागेचे व्यवस्थापन करणे, माहितीचे संकलन करणे इ.
(३) समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभाग तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी कार्यवाही करण्याबाबत दि.१/८/२०२३ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोर (जि.पुणे) तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी मंजूरी देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत

**(३५) ६८२०२ (३१-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे), मौजे आंबवडे (ता.भोर), मौजे अंबवणे, मौजे वेल्हे व मौजे पानशेत (ता.वेल्हे) तसेच मौजे पौड, मौजे पिरंगुट, मौजे ताथवडे व मौजे घोटावडे (ता.मुळशी) या ठिकाणी मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे आवश्यक असून त्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ नोव्हेबंर, २०२२ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त कार्यालयाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय तसेच सदरचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ता. मुळशी जि.पुणे येथे ०८ तलाठी कार्यालयाचे बांधकामास रुपये १९०.०० लक्ष व ता. वेल्हे जि. पुणे येथे १० तलाठी कार्यालय इमारत बांधकामास रु.२३०.०० लक्ष इतक्या रकमेस महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १०/०६/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त कामाच्या मंजूर निधीपैकी १० टक्के निधी वितरीत करण्यात आला असून २०२३-२४ या वर्षी अनुक्रमे रुपये १६.३० व रुपये १९.७३ इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. कामाची प्रगती व निधीची उपलब्धता विचारात घेऊन निधी उपलब्ध करुन देण्याची बाब कार्यवाहीत आहे.

तसेच ता. भोर, जि. पुणे येथे २० तलाठी व ०५ मंडळ अधिकारी कार्यालयांचे बांधकामास रुपये ३७५.०० लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०७/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी रिंगरोड प्रकल्पास मंजुरी मिळण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) ६८३९३ (२७-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडीतील रिंगरोड प्रकल्पाबाबत तत्कालीन मा.मंत्री (नगर विकास) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५ मे, २०२१ रोजी बैठक घेऊन मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडीतील वाहतूक कोंडीमुळे भिवंडी रिंगरोड प्रकल्पास मंजुरी मिळण्याबाबत व निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकल्पामधील ९ बाधित गावांपैकी ३ गावांतील बाधित होणाऱ्या भूसंपादनाची संयुक्त मोजणी पार पडली असून उर्वरीत ६ गावांमधील बाधित लोकांचा विरोध असल्यामुळे सध्या भूसंपादनाचे काम स्थगित केले आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी मनपातील शिक्षक यांची चुकीच्या पद्धतीने पदोन्नती देऊन शासनाची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(३७) ६८३९८ (३१-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महानगरपालिकेतील शिक्षक श्री.किशोर मल्यशम वडनाल यांना भिवंडी मनपाने चुकीच्या पद्धतीने पदोन्नती देऊन शासनाची आर्थिक फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकाची सन २००९ मध्ये अप्रशिक्षित शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आल्यानंतर सन २०१० मध्ये त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी व पदवीधर वेतनश्रेणी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षकांची शिक्षक म्हणून नेमणूक केली असतानाही शाळेत न जाता भिवंडी महानगरपालिकेमध्ये कार्यालयीन काम करीत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडी मनपातील शिक्षक श्री.किशोर मल्यशम वडनाल यांची चुकीच्या पद्धतीने पदोन्नती देऊन शासनाची आर्थिक फसवणूक केल्याबाबत त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतील शिक्षक श्री.किशोर मल्यशम वडनाल यांच्याविरोधात तक्रारी प्राप्त झाल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेकडील सेवा पुस्तकेतील नोंदीवरुन उपरोक्त शिक्षक श्री. वडनाल यांची नियुक्ती सन २००९ मध्ये केल्याचे व सन २०१० मध्ये पदवीधर वेतनश्रेणी दिल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) सदर प्रकरणी दिनांक २७.०६.२०२३ च्या महानगरपालिकेच्या स्तरावरील आदेशान्वये उपरोक्त शिक्षकाच्या सेवा महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षक या पदावर वर्ग करण्यात आल्या असून ते सद्यस्थितीत तेथे कार्यरत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर प्रकरणी उप आयुक्त (मुख्यालय) यांना विशेष चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्त केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयातील नर्सिंग अभ्यासक्रमाचा प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत**

**(३८) ६८४०१ (३१-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदवीधर संस्थेत वायसीएम रुग्णालयामध्ये सन २०१९ मध्ये वैद्यकीय अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वायसीएम रुग्णालयात आरोग्य सेवेवर पडणारा अतिरिक्त ताण कमी होण्यासाठी नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२२ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने वायसीएम रुग्णालय पदवीधर संस्थेत नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतचा प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्ताव प्राप्त झालेला असून कर्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची झालेल्या महासभेच्या ठरावाबाबत**

**(३९) ६८४१५ (३१-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची दिनांक २५ मे, २०२२ रोजी झालेल्या महासभेच्या ठरावाबाबत माहिती मिळणेकामी मा. आयुक्त/प्रशासन भिवंडी मनपा यांस स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने दि १ फेब्रुवारी, २०२३ रोजी निवेदन सादर करण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त उत्तरानुसार सदर सभेचे विषयपत्रिका, सभेत पारित झालेले सर्व ठरावाच्या प्रती व इतिवृत्त महापालिकेची मुदत संपल्याने अद्याप कायम करण्यात झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठरावांची अंमलबाजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत प्रशासनामार्फत व शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) अशा प्रकारचे निवेदन महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झाले आहे.

(२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिनांक २५.०५.२०२२ रोजी सभा झाल्यानंतर दिनांक ०८.०६.२०२२ ला महानगरपालिकेची मुदत संपुष्टात आल्यानंतर दिनांक १०.०६.२०२२ च्या शासन आदेशान्वये नियुक्त झालेल्या प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी उक्त सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता दिली आहे.

(३) व (४) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार उपरोक्त सभेतील १७ प्रस्तावांपैकी ६ ठरावांची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. तर ८ ठरावांची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे. तसेच २ ठरावांबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासह फेरीवाल्यांकरीता नियोजन करण्याबाबत

**(४०) ६८५६८ (२४-०८-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहराच्या मध्यभागी असलेल्या महात्मा गांधी चौकात फेरीवाल्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने येथील नागरिकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी तसेच फेरीवाल्यांचा वाहतुकीला त्रास होणार नाही या दृष्टीने नियोजन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी हिंगोली नगरपरिषद व वाहतूक पोलीस यंत्रणेमार्फत फेरिवाल्यांकरीता शहरातील जवाहर रोड येथील जागा निश्चित करुन, त्याठिकाणी त्यांना स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील प्रकल्पबाधितांना वितरण करावयाच्या सदनिकांमध्ये बोगस नावांचा समावेश करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(४१) ६८६१२ (२५-०८-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरु असलेल्या विकास कामांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना घरे देण्याकरिता सन २०२१ मध्ये २८ आदिवासी लाभार्थींसाठी शिफारस घेण्यात आली तथापि त्यात ६१ बोगस आदिवासींच्या नावाचा समावेश करुन त्यांच्या नावे घरे घेऊन व त्याची विक्री करुन कोट्यावधी रुपयाचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी सामाजिक संघटनेच्या अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री, गृहमंत्री, नगरविकास मंत्री, आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार व निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यामध्ये किती बोगस नावांचा समावेश करुन सदनिका प्राप्त करुन त्याची विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने मुळ प्रकल्पग्रस्ताना घरे देण्याकरिता तसेच गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) दि. २४.०४.२०२३ रोजीचे पत्र / निवेदन प्राप्त झाले नसून तशा आशयाचे दि. ११.०४.२०२३ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. परंतु सदर प्रकरणाच्या अनुषंगाने चौकशी केली असता यामध्ये कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही. प्रकरणी ६१ प्रकल्पग्रस्तांना झो.पु.प्रा. कडील प्राप्त सदनिका अद्याप वितरीत केलेल्या नाहीत. प्रकल्पग्रस्तांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या अनुषंगाने तपासणी करुन सदनिका वितरीत करण्याची कार्यवाही प्राधिकरणाच्या स्तरावर नियमानुसार करण्यात येईल.

---

**भिवंडी शहरातील(जि.ठाणे) भाजी मंडई व सुसज्ज भाजी मार्केट उभारणीकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४२) ६८६४६ (३१-०८-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर महानगरपालिका भिवंडी कोटरगेट येथील सर्वे क्र.९२६ ते ९३१ क्षेत्र ०.४६८ हे. आर. जागा ही आरक्षण क्र.५४ भाजी मंडई व सुसज्ज भाजी मार्केट उभारणीकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वे क्र. ९२६ ते ९३१ क्षेत्र ०.४६८ हे. आर. जागा ही आरक्षण क्र. ५४ भाजी मंडई व सुसज्ज भाजी मार्केट आरक्षित भूखंड हा भाडेतत्वावर देण्याचा निर्णय भिवंडी महानगरपालिकेने घेतला असून याला स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना निवेदन देऊन विरोध दर्शविला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदर प्रकरणी निधी मागणीस अनुसरून सन २०२३ -२४ मधील मंजुर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त झालेल्या मागण्या यांचा विचार करुन तद्नंतर निधी मंजुरीबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गेवराई तालुक्यात बांधलेली अनेक तलाठी कार्यालये अद्यापही ताब्यात न घेतल्याबाबत**

**(४३) ६८८०६ (२७-०८-२०२३). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यामध्ये शासनाने लाखो रुपये खर्च करून बांधलेली अनेक तलाठी कार्यालये महसूल विभागाने अद्यापपर्यंत ताब्यात घेऊन तेथे तलाठी कार्यालय सुरू केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ताब्यात घेतलेली तलाठी कार्यालयात तेथे संबंधित अधिकारी बसत नसून अंमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सामान्य नागरिकांची हेळसांड होऊ नये म्हणून लाखो रुपये खर्च करून सज्याच्या ठिकाणी तलाठी कार्यालय बांधून तेथेच नागरिकांना सुविधा देण्याचा शासनाचा मानस असताना बहुतांश ठिकाणी तसे होत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व तलाठी कार्यालयाचा महसूल विभागाने ताबा घेऊन कार्यालयीन वेळेत तेथे संबंधित अधिकाऱ्यामार्फत कामकाज व्हावे व नागरिकांना सुविधा उपलब्ध व्हाव्यात याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई यांच्या दिनांक ०४/०७/२०२३ च्या पत्रान्वये ३८ तलाठी कार्यालयांचा ताबा देण्यात आलेला असून तेथे कार्यालये सुरु असून कामकाज होत आहे.

तसेच ताबा न घेतलेल्या १५ तलाठी कार्यालयांचे कामकाज पुर्ण झालेले असून तेथे मुलभूत सुविधा जसे की, लाईट कनेक्शन नसल्याने संगणक, प्रिंटर याचा वापर करता येत नसून सदरील तलाठी कार्यालयाचे दरवाजे व खिडक्या नादुरुस्त असून ते वास्तव्यात आणणे व तेथे राहणे योग्य नसल्यामुळे संबंधित तलाठी कार्यालयाची दुरुस्ती करुन ताबा देण्याबाबत तहसिलदार, गेवराई यांनी दि.१९/०६/२०२३ व दि.२६/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(४४) ६८९७५ (३१-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५ (उप कलम-१) नुसार राज्यात एक मुख्य माहिती आयुक्त व ७ राज्य माहिती आयुक्त असलेला राज्य माहिती आयोग घटीत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य माहिती आयोगातील मुख्य माहिती आयुक्तपद तसेच चार विभागीय माहिती आयुक्तांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे प्रथम व द्वितीय अपीलांची प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच अपीलाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाचे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे
(२), (३) व (४) राज्य माहिती आयोग कार्यालयातील राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि तीन राज्य माहिती आयुक्त अशी एकून चार पदे रिक्त आहेत. मात्र या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य माहिती आयुक्तांकडे सोपविण्यात आला आहे. प्रथम अपीलाच्या उत्तराने अपीलार्थीचे समाधान न झाल्यास राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे द्वितीय अपील सादर करण्यात येते त्यामुळे राज्य माहिती आयुक्तांच्या रिक्त पदामुळे प्रथम अपील प्रलंबीत राहतात हे खरे नाही. सद्यस्थितीमध्ये राज्य माहिती आयुक्त यांच्या कार्यालयातील खंडपीठनिहाय प्रलंबित द्वितीय अपीलांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| खंडपीठे | प्रलंबित द्वितीय अपीलांची संख्या |
|---|---|
| मुख्यालय | १७५२१ |
| बृहन्मुंबई | ५३८९ |
| कोकण | ६६१२ |
| पुणे | १८९९८ |
| नाशिक | ११४०२ |
| छत्रपती संभाजीनगर | २२६११ |
| अमरावती | १३४७५ |
| नागपूर | ५३३४ |

राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि ३ राज्य माहिती आयुक्त पदावर नियमित नियुक्ती करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये जाहिरात देण्यात आली होती. या जाहिरातीस अनुलक्षून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन विहित नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाकडून दिव्यांगसाठीच्या पाच टक्के निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(४५) ६८९७८ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाकडून दिव्यांग कल्याणसाठीचे सन २०२२ पर्यंत ४५ कोटी तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील ८ कोटी अखर्चित राहिले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अखर्चित राहिलेला निधी सन २०२३-२४ मध्ये वर्ग करावा अशी मागणी समाजकल्याण विभागाने महापालिकेच्या वित्त विभागाला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेकडून दिव्यांग कल्याणकारी योजना राबवण्यासाठी दिव्यांगसाठीच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तरतूद करण्यात आली असता, या योजनांकरीता निधी खर्च करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास दिव्यांगासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाच्या पाच टक्के निधी दरवर्षी खर्च करावा असे शासनाचे आदेश असतानाही पुणे महानगरपालिकेने हा निधी खर्च केला नसल्याने शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(५) नसल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सत्वर कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सन २०२२-२०२३ या वर्षात प्राप्त पात्र अर्जांपैकी सर्वाना लाभ देणेत आला. तथापि रु.८.२४ कोटी शिल्लक राहिले ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सन २०२२-२०२३या वर्षात समाज विकास विभागाकडून दिव्यांग कल्याणकारी योजना राबवण्यासाठी दिव्यांगासाठीच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये ३६ मेळावे घेणेत आले. तसेच यासाठी वृत्तपत्रात जाहिरात, सोशल मिडीया या द्वारे प्रचार व प्रसार करण्यात आला आहे. याकरिता निधी खर्च करणेत आला आहे.
(४) पात्र सर्वच अर्जांना लाभ देण्यात आला असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेमार्फत (पीएमसी) सुरू असलेल्या रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पाबाबत

**(४६) ६९०८८ (०३-०९-२०२३). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेमार्फत (पीएमसी) सुरू असलेल्या रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या विविध विभागाच्या परवानग्या महानगरपालिकेने घेतल्या नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी ६००० झाडांची कत्तल करण्यात येणार असून, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (पश्चिम खंडपीठ) यांनी आवश्यक परवानग्या मिळेपर्यंत झाडे तोडू नयेत किंवा स्थलांतरित करू नयेत असे निर्देश दिले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे नदीचा क्रॉस सेक्शन कमी होणार असून नदीच्या दोन्ही बाजूस मातीचा भरणा केल्यामुळे पात्रही अरुंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने सदर प्रकल्पास स्थानिक जनतेचा विरोध असताना तसेच विविध विभागाच्या परवानग्या न घेता प्रकल्प सुरु करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या प्रारूप आराखड्यास पुणे महानगरपालिका मुख्य सभेची दि.२३.०८.२०१८ रोजी मान्यता प्राप्त असून, जलसंपदा विभाग(WRD), केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्था (CWPRS), पर्यावरण विभाग (SEIAA) इत्यादी विभागांची तत्वत: मान्यता घेण्यात आलेली आहे.
(२) नदी पुनरुज्जीवन प्रकल्प टप्पा क्र. ९, १० व ११ येथील प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या वृक्षाबाबतचा प्रस्ताव पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई यांचेकडे दि.०६.०६.२०२३ रोजी पुणे महानगरपालिकेकडून दाखल करणेत आलेला आहे. सदरचा प्रस्ताव मान्य झाले खेरीज सदर प्रकल्पांतर्गतची झाडे काढण्यात येणार नाहीत. अशा आशयाचे आदेश मे. हरित लवादकडून प्राप्त आहेत.
(३) हे खरे नाही.
नदीचे सुधारित काटछेदामुळे नदीची वहन क्षमता वाढणार असून त्या बाबतची तपासणी CWPRS खडकवासला पुणे या संस्थेकडून करून घेण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो भिवंडीत भूमिगत करण्याबाबत**

**(४७) ६९१३९ (०४-०९-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-भिवंडी-कल्याण अशी सुमारे ८ हजार कोटी रुपये खर्चाची मेट्रो भिवंडीत भूमिगत करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) प्रस्तावित भूमिगत मार्गिकेबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करावा, तसेच प्रकल्पाच्या वाढीव खर्चाचा सर्व भार प्राधिकरणाने उचलावा असे आदेश विभागाने प्राधिकरणाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राधिकरणाने प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर केला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) मेट्रो मार्ग -५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या उन्नत मेट्रो प्रकल्पातील धामणकर नाका ते टेमघर दरम्यान उन्नत मार्गिकेऐवजी भूमिगत मार्गिका उभारण्यास दि. ०६.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
त्याअनुषंगाने भुमिगत मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

### कोंढाळी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील ग्राम पंचायतीला नगरपंचायतचा दर्जा देण्याबाबत

**(४८) ६९२४२ (०३-०९-२०२३). श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाळी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील ग्रामपंचायतीला नगर पंचायतचा दर्जा देण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शासनाकडून दिनांक २१ जून, २०२३ अन्वये कोंढाळी नगरपंचायत स्थापनेबाबत प्राथमिक उद्घोषणा निर्गमित केली आहे. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून नगरपंचायत स्थापनेबाबत हरकती / आक्षेप अहवाल प्राप्त झाल्यानंतर अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या लघु पाटंबधारे विभागाने सहकारी उपसा सिंचन योजनांच्या बनावट परवान्यावर अनुदान दिल्याबाबत

**(४९) ६९६७४ (३१-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या लघु पाटंबधारे विभागाने सहकारी उपसा सिंचन योजनांना बनावट परवान्यावर कोटयवधी रुपयांचे अनुदान दिल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी उपसा सिंचन योजनाकरिता शासनाकडून निकष डावलून उपसा योजनांना मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०६-१०-२०२३) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे,

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार व मृद व जलसंधारण विभागाच्या २० जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार उपसा सिंचन प्रकल्प हाती घेण्यात येतात असे नमूद केलेले आहे. तसेच मृद व जलसंधारण विभागाकडील दि. ११ फेब्रुवारी,२०२२ नुसार उपसा सिंचन कामांचे आर्थिक मापदंड, लाभव्यव गुणोत्तर इत्यादी निकष नमूद केलेले आहेत. त्यानुसार उपसा सिंचन योजनेची कामी हाती घेण्यात आलेली होती.

(३) सदर पाणी परवान्याबाबत चौकशी करण्यात आली असून बोगस परवाना देणा-या संस्थेवर F.I.R.(फौजदारी) गुन्हा दाखल करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार पाणी वापर संस्थेवर F.I.R. (फौजदारी) गुन्हा दाखल करण्यात आला असून कनिष्ठ उपअभियंता, उपविभागीय जलसंधारण अधिकारी व तत्कालीन जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे मनपा हद्दीतील ओवला-माजिवडा येथील सूर्या प्रकल्पामध्ये दोरजे धरणातून**
**२०० एमएलटी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(५०) ६९८१२ (०४-०९-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील ओवला-माजिवडा येथील सूर्या प्रकल्पामध्ये दोरजे धरणातून २०० एमएलटी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी देहरजी मध्यम प्रकल्प जि.पालघर याबाबत शासन निर्णय दिनांक ०४.०३.२०१४ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत. उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने पाणी वाटपात बदल करणे अंतर्गत आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही जलसंपदा विभागामार्फत सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.